महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ( विद्या परिषद ) पुणे

**राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा**

## पूर्व प्राथमिक शिक्षण अंगणवाडी गट

# शिकू आनंदे

# हसत - खेळत अंगणवाडीसंगे !


**नवोपक्रम कर्ता**

श्रीम. मंगला विष्णू चव्हाण

( बारावी )

**अंगणवाडी सेविका**

अंगणवाडी नाखरे नं. 1, ता.जि. रत्नागिरी


**सन**

**2023 - 2024**

## एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1 | नवोपक्रमाचे शीर्षक | 04 |
| 2 | नवोपक्रमाची गरज व महत्त्व | 06 |
| 3 | नवोपक्रमाची उद्‌दिष्टे | 08 |
| 4 | नवोपक्रमाचे नियोजन | 09 |
| 5 | नवोपक्रमाची कार्यपद्‌धती | 12 |
| 6 | नवोपक्रमाची यशस्वीता व फलनिष्पत्ती | 15 |
| 7 | समारोप | 16 |
| 8 | संदर्भसूची व परिशिष्टे | 17 ते 20 |


**शिकू आनंदे ,**
**हसत - खेळत अंगणवाडीसंगे !**

एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प, रत्नागिरी अंतर्गत

अंगणवाडी नाखरे नं.1, ता.जि.रत्नागिरी

## स्पर्धक सेविका माहिती



| | | |
|---|---|---|
| नाव | - | श्रीमती. मंगला विष्णू चव्हाण |
| शिक्षण | - | एच्.एस्.सी. |
| जन्मतारीख | - | 28 / 11 / 1983 |
| मोबाईल नंबर | - | 9673005840 |
| सेवा कालावधी | - | 21 वर्षे |
| अंगणवाडी केंद्र | - | अंगणवाडी, नाखरे नं.1 |
| पत्ता | - | मु.पो. नाखरे , ता.जि.रत्नागिरी |
| Email id | - | chavanmangala073@gmail.com |

1) <u>नवोपक्रमाचे शीर्षक</u>

# शिकू आनंदे ,

# हसत - खेळत अंगणवाडीसंगे !

## प्रस्तावना

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पांतर्गत नाखरे , ता.जि. रत्नागिरी येथे अंगणवाडी सेविका पदावर फेब्रुवारी 2010 पासून कार्यरत आहे. तत्पूर्वी माहे एप्रिल 2002 मध्ये बालवाडीताई म्हणून याच ठिकाणी नेमणूक झाली होती. माझी अंगणवाडी मिनी अंगणवाडी असून ती शाळेच्याच एका वर्गखोलीत भरते. त्यामुळे मुलांच्या शिक्षणाचा श्रीगणेशा एकाच आवारात होतो. अंगणवाडी , शाळा स्वतंत्र नसल्याने समूहात मुलेही आवडीने येतात, समरस होतात.

पूर्व प्राथमिक शिक्षण शिक्षणाचा पाया आहे. खरं तर 3 ते 6 वयोगटातील मुलांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकास झपाट्याने होतो त्यामुळे या वयातच योग्य वातावरणाची गरज असते. व्यक्तीचा सर्वांगीण समतोल विकास करणे, हे शिक्षणाचे ध्येय आहे. त्याअनुषंगाने बालकाच्या शिक्षणाची सुरुवात चांगली झाली पाहिजे, त्यांना शिक्षणाची गोडी लागली पाहिजे यासाठी माझा नेहमीच प्रयत्न असतो. तरीही नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणासंबंधाने शाळेत होणारी शिक्षणविषयक चर्चा ऐकली आणि कोरोनानंतरच्या शिक्षणात काळानुरुप बदलावे यासाठी हा उपक्रम निवडला आहे.

आपण बालकाला जेवढे पोषक वातावरण पुरवू , निरनिराळ्या प्रकारचे उत्तेजन देवू, तेवढ्या प्रमाणात मेंदू सर्व क्षमतांसहीत विकसित होतो. म्हणूनच 3 ते 6 वर्ष हाच काळ बालकांसाठी कसा अत्यंत महत्त्वाचा असतो , यावरही शाळेत अनेकदा संवाद होतो. त्यातून बालकाच्या जीवनाच्या प्रारंभिक काळाचे महत्त्व उमजल्यानेच माझ्या अंगणवाडी, नाखरे नं. 1 मध्ये राबविलेला उपक्रम म्हणजेच ......

**शिकू आनंदे ,**

**हसत - खेळत अंगणवाडीसंगे !**

## 2) नवोपक्रमाची गरज व महत्त्व

**शिकू आनंदे ,**
**हसत - खेळत अंगणवाडीसंगे !**

कोरोना काळात शिक्षणाला ब्रेक लागला. मुले घरी राहिली. परिणामी शाळा सुरु होताच पालकांच्या अनेक तक्रारी सुरु झाल्या. काही मुले शाळेत येताना कुरकूर करू लागली. जी आली त्यांना मोबाईल हवाहवासा वाटू लागला. एकूणच घरी राहिल्याने मुलांची शिक्षणविषयक रुची कमी झाल्याने अस्वस्थ वाटू लागले. नेहमी आनंदाने येणारी ही देवाघरची फुले काहीबाही कारणांने शाळेपासून दूर का बरे जात आहेत ? काही करून त्यांना शाळेत रमवावे, प्राथमिक शिक्षणासाठी सज्ज करावे यासाठीच शाळेतील शिक्षकांच्या साहाय्याने शिकू आनंदे, हसत - खेळत अंगणवाडीसंगे हा उपक्रम शैक्षणिक वर्ष 2023 / 2024 च्या प्रारंभीच हाती घेतला.

तसे पाहिले तर प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाला पूरक म्हणून नव्हे तर पायाभूत म्हणूनच बालशिक्षणाला महत्त्व आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्येही वयवर्षे 3 ते 6 ला अत्यंत महत्त्व दिले आहे. त्याअनुषंगाने वयोगटनिहाय क्षमतांची तयारी करून घेणे हे अंगणवाडीताई या नात्याने मी माझे कर्तव्य समजते. या नवोपक्रमाच्या माध्यमातून मुलांच्या प्राथमिक शिक्षणाचा पाया मजबूत करणे सहज शक्य होईल.

माझ्या या नवोपक्रमातून शालेय जीवनात लहान मुलांचे पहिले पाऊल दमदार आणि तयारीसह असण्याची खात्री पालकांना आवर्जून येईल. मुलांवरील अदृश्य दबाव दूर होईल. तसेच जिल्हा परिषद शाळेत दाखल मुलांची पटसंख्यादेखील निश्चितच वाढेल. थोडक्यात मुले, माता यांसह समाजाचा आत्मविश्वास वाढविण्यासही जो मदत करेल तो आमचा उपक्रम म्हणजे..

**शिकू आनंदे ,**
**हसत - खेळत अंगणवाडीसंगे !**

## नवोपक्रमाचे महत्त्व

**शिकू आनंदे ,**
**हसत - खेळत अंगणवाडीसंगे !**

- बालकांचा दिनक्रम , उपक्रम यांत बदल झाला.
- अनौपचारिक वातावरणात प्राथमिक शाळेची पायाभूत तयारी झाली.
- बालकांच्या विकासानुसार खेळ, कृती, उपक्रम दिले गेले.
- बालकांच्या वयाला योग्य खेळणी मिळाली. त्यांना मुक्तपणे खेळता आले.
- बालकांच्या सर्वंकष विकासास उपक्रम साहाय्यभूत झाला.
- प्रत्येक मूल बोलू लागलं.
- त्यांचा आपआपसांतील संवाद वाढला.
- शाळा परिसर , शिक्षण याविषयी भिती नाहिशी झाली.
- शिक्षण आनंददायी बनले.
- पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक शिक्षक या दोन्हींविषयी मुलांना आपुलकी निर्माण झाली.
- पालकांचा अंगणवाडीत केवळ आहार वाटप केले जाते, मुलांना काही शिकवत नाहीत हा समज दूर झाला उलट खाजगी शाळांतील शिशुगटांपेक्षा गावातील अंगणवाडीत मुले चांगले शिकत आहेत , याची जाणीव झाली. त्यामुळे राबवलेला पुढील उपक्रम निश्चितच महत्त्वपूर्ण आहे, अर्थात.....

**शिकू आनंदे ,**

**हसत - खेळत अंगणवाडीसंगे !**

## 3) नवोपक्रमाची उद्दिष्टे

**शिकू आनंदे ,**
**हसत - खेळत अंगणवाडीसंगे !**

1. पूर्व प्राथमिक शिक्षणाचा पाया बळकट करणे.
2. बालकांना चांगले बोलावयास शिकवणे.
3. नियमितपणा , शिस्त, टापटीप याची सवय लावणे.
4. बालकांना नवीन नवीन निर्मिती करण्यास वाव देणे.
5. सहकार्याची भावना विकसित करणे.
6. निरीक्षण व अनुकरण शक्तीचा विकास करणे.
7. चांगल्या आरोग्याच्या सवयी व मूल्ये रुजविण्याचा प्रयत्न करणे.
8. प्रेम, प्रोत्साहन, पोषण याद्वारे बालकांचा उत्साह वाढविणे.

पूर्व प्राथमिक शिक्षण हा पुढील शिक्षणाचा पाया आहे. इमारतीचा पाया पक्का असेल तर इमारत बरेच दिवस टिकते. मुलांच्या शिक्षणाचा पाया पक्का असेल तर पुढील शिक्षणाची आणि भावी आयुष्याची इमारत पक्की होईल हा विचार प्रमाण मानून मी केलेला हा छोटासा प्रयत्न ! यातून सर्व अंगणवाडी सेविकांना नक्कीच प्रेरणा मिळेल. माझ्या अंगणवाडी स्तरावर राबवलेला आणि सर्वांना उपयुक्त ठरणारा असा हा उपक्रम म्हणजे.....

**शिकू आनंदे ,**

**हसत - खेळत अंगणवाडीसंगे !**

## 4) **नवोपक्रमाचे नियोजन**

शैक्षणिक वर्ष 2023 / 2024 ची सुरुवात राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 NEP च्या अनुषंगाने झाली. त्यातील निपुण भारत अभियानांतर्गत शैक्षणिक लक्ष्याबाबत शाळास्तरावर सातत्याने चर्चा होत होत्या. निर्मल ग्रामपंचायत नाखरेच्या ग्रामसभेत आमच्या आदर्श शाळा नाखरे नं. 1 चे पदवीधर शिक्षक श्री.सुहास वाडेकर सर यांनीही निपुण भारत बाबत सविस्तर मार्गदर्शन केले होते. त्यातून आता पूर्व प्राथमिक शिक्षणाला महत्त्व आले आहे , हे लक्षात आले.

माझी मिनी अंगणवाडी शाळेच्या वर्गखोलीतच भरत असल्याने आणि मुख्याध्यापक , शिक्षकवर्ग, अंगणवाडीताई एकाच मंचावरून परस्परांना साहाय्य करीत असल्याने गावातील शाळा आणि मुले यांच्या पायाभरणीकरिता मी पुढाकार घेवून सदर उपक्रम हाती घेतला. या उपक्रमाच्या अंमलबजावणीत अंगणवाडी सुपरवायझर सावंत मॅडम, श्री. गावखडकर सर, इंगोले मॅडम यांचेही मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ( डायट ) रत्नागिरी यांचेशी प्रत्यक्ष संपर्क नसला तरी आमच्या आदर्श शाळा नाखरे नं. 1 चे पदवीधर शिक्षक श्री. सुहास वाडेकर सर यांचा प्रशिक्षणाद्वारे डायट ,रत्नागिरीशी संपर्क असल्याने तसेच आम्हा शिक्षकांचा सहमतीने शाळेचा विकास व्हॉटसॅप ग्रुप असल्याने सर्व परिपत्रकांची माहिती मिळाली. त्यातून पूर्व प्राथमिक शिक्षणामुळे लहान मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न सुटतो, हे लक्षात आले. त्यामुळे आपल्या गावातील मुलांना अक्षर व अंक ओळख करून देवून त्यांचा इयत्ता पहिलीचा प्रवेश सुकर आणि आनंददायी करण्याचे ठरवले . त्यासाठी उपक्रम नियोजित केला,

**शिकू आनंदे ,**

**हसत - खेळत अंगणवाडीसंगे !**

## नवोपक्रम नियोजनातील टप्पे

**अ) नवोपक्रमाचे आयोजन** -

माहे 1 जुलै 2023 ते 31 ऑक्टोबर 2023 या कालावधीत केले होते. त्यासाठी आमच्या अंगणवाडी नाखरे नं.1 मधील 3 ते 6 वयोगटातील सर्वच्या सर्व म्हणजे 10 बालकांची नवोपक्रमासाठी निवड करण्यात आली.

**आ) उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण -**

शाळास्तरावर राबविण्यात आलेल्या शाळापूर्व तयारी मेळाव्यात आमच्या अंगणवाडीतील बालके आणि पालक दोघांनाही मुख्याध्यापक श्री. शशिकांत घाणेकर सर यांनी संधी दिली असल्याने काही ठळक बाबी पुढीलप्रमाणे निदर्शनास आल्या.

1. बोलताना मुलांत आत्मविश्वास कमी जाणवला. ती घाबरत होती.
2. ब-याच बालकांना दोरी उडी मारता आली नाही.
3. होडी बनविणे, चित्र रंगवणे या कृती करायला पालकांची मदत लागत होती.
4. इयत्ता पहिलीत प्रवेश घेणा-या बालकांना अधलीमधली मुळाक्षरे ओळखता येत नव्हती.
5. 1 ते 10 अंकांचा संबोध स्पष्ट नव्हता.
6. परिसरातील वस्तू , नातेवाईक , रंग, चव , प्राणी, पक्षी, वाहने याबाबत पुरेशी माहिती नव्हती.
7. आपल्या पाल्यांना परिसरातील , दैनंदिन व्यवहारातील ज्ञान देण्याचा पालकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला नाही.
8. पालकांना अंगणवाडी म्हणजे निव्वळ आहारवाटप केंद्र आणि दुपारपर्यंत अंगणवाडीताईंनी आपल्या बालकांना सांभाळावयाचे ठिकाण वाटत होते.

9. अंगणवाडीत शाळापूर्व तयारी शिक्षण काय असते ? हे पालकांना माहिती नव्हते.

10. बालकांची वयानुरुप कारककौशल्ये वेगवेगळी असतात, याबाबत पालक अनभिज्ञ होते.

**इ) आवश्यक साधने -**

अंगणवाडीतील बालकांचा दररोजचा वेळ आनंदात जावा तसेच आनंदाने हसत - खेळत नकळत शिक्षणही व्हावे, याकरिता नेमके काय करता येईल , यावर चर्चा करण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांचा भाषिक, भावनिक, बौद्धिक, क्रियात्मक विकास होण्यासाठी विविध साधनांचा उपयोग करून नियोजन करण्यात आले. यासाठी पुढील गोष्टींचा आधार घेण्यात आला.

1. पहिलं पाऊल THE FIRST STEP पुस्तिका संकलित केली.
2. अंगणवाडीत सर्वत्र सहज उपलब्ध होईल अशा साहित्याचा पेटारा केला. त्यास ‘ जादूचा पेटारा - अंगणवाडी नाखरे नं.1’ असे नाव दिले.
3. छोटे खेळ संकलित केले. त्याची प्रात्यक्षिके घेतली.
4. वार्षिक प्रश्नावली, सूचना, कृती यांचे संकलन केले.
5. शारीरिक व कारक विकासासाठी सहाय्यभूत होतील असे उपक्रम निवडले.
6. बौद्धिक - भाषिक व सामाजिक - भावनिक विकासासाठी उपयुक्त कृतींची निवड केली. प्रात्यक्षिके घेतली.
7. मानसिक कौशल्यांची यादी केली आणि पडताळा घेतला.
8. बालकांच्या सादरीकरणाचे व्हिडिओ केले.

यानंतर पुरेशी तयारी झाल्याची खात्री करून नवोपक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली.

## 5) नवोपक्रमाची कार्यपद्धती

**शिकू आनंदे ,**
**हसत - खेळत अंगणवाडीसंगे !**

अंगणवाडीत नवोपक्रम राबवायचा ठरल्यानंतर पालकांची सभा घेतली. त्यांना उपक्रमाची माहिती दिली आणि सहकार्याचे आवाहन केले. तसेच कृतींबाबत वारंवार संपर्क ठेवला. प्रगतीचा आढावा घेतला. आवश्यक तेथे पुनर्भरण केले.

नवोपक्रमात अंगणवाडीस्तरावर घेतलेल्या कृतींचा सविस्तर तपशील आणि व्हिडिओ पुढीलप्रमाणे.

https://youtu.be/xHd3bM-q7v8?si=dzqm3LQPBtSSDYch

**कृती क्रमांक1 :** वजन , उंची मोजणे.

बालकांचे वय, वजन, उंची यांची नोंद ठेवली. पालकांना वेळोवेळी माहिती दिली.

**कृती क्रमांक 2 :** खेळ / कृती मध्ये सहभागी होणे.

**कृती क्रमांक 3 :** चित्र पाहा , नाव सांगा.

**कृती क्रमांक 4 :** चित्र रंगवा.

**कृती क्रमांक 5 :** फरक ओळखा . आकाराशी संबंधित : लहान - मोठा

लांबीशी संबंधित संबंधित : लांब - आखूड

आकारमानाशी संबंधित : जाड - बारीक

मापना संबंधित : जास्त - कमी

उंचीशी संबंधित : उंच - बुटका

वजनाशी संबंधित : जड - हलका

रुंदीशी संबंधित : रुंद - अरुंद

**कृती क्रमांक 6 :** दैनंदिन वापरातील वस्तूंची नावे सांगणे , उपयोग सांगणे.

**कृती क्रमांक 7 :** स्वच्छता - व्यक्तिगत स्वच्छता व सामूहिक स्वच्छता

**कृती क्रमांक 8 :** दिलेल्या वस्तूंचा क्रम लावणे.

**कृती क्रमांक 9 :** एकत्रित केलेल्या तीन चार डाळी निवडणे / वेगळ्या करणे.

**कृती क्रमांक 10 :** रुमाल/ कागद / कापड यांच्या घडया घालणे.

**कृती क्रमांक 11 :** काढलेल्या आकारावर डाळी / बिया लावणे.

**कृती क्रमांक 12 :** सरळ रेषेत / नागमोडी चालणे.

**कृती क्रमांक 13 :** चेंडू फेकणे / झेलणे / पकडणे / बादलीत टाकणे.

**कृती क्रमांक 14 :** लंगडी घालणे.

**कृती क्रमांक 15 :** ठसेकाम करता येणे.

**कृती क्रमांक 16 :** विविध भौमितिक आकार ओळखता येणे.

**कृती क्रमांक 17 :** दोरीच्या उड्या / साध्या उड्या तालबद्धतेने मारता येणे.

**कृती क्रमांक 18 :** रंग ओळखणे.

**कृती क्रमांक 19 :** चव ओळखणे.

**कृती क्रमांक 20 :** ज्ञानेंद्रियांची माहिती देणे.

**कृती क्रमांक 21 :** उभे राहून बोलता येणे. (आठवड्याचे वार, इंग्रजी - मराठी महिने, आपले सण , पाळीव प्राणी , जंगली प्राणी, वाहने, भाज्या, पक्षी, व्यावसायिक, रंग , ऋतू )

**कृती क्रमांक 22 :** स्वत:ची व कुटुंबाची ओळख.

**कृती क्रमांक 23 :** अक्षर ओळख.

**कृती क्रमांक 24 :** 1 ते 10 अंकांची ओळख.

**कृती क्रमांक 25 :** न घाबरता बोलता येणे.

## कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन

1. पालकांचा उत्सफूर्त प्रतिसाद मिळाला.
2. पालकांनी खाजगी अंगणवाडीत दाखल केलेली साईश्री पाडळकर या उपक्रमाने आमच्या सरकारी अंगणवाडी नाखरे नं.1 मध्ये दाखल झाली.
3. बालकांना कृती करायला आवडू लागले.
4. बालके कृतींमध्ये आनंदाने सहभागी होऊ लागली.
5. कृतींचे फोटो आणि व्हिडिओ संकलन केले आहे.

## कार्यवाही पश्चात केलेली निरीक्षणे व माहिती संकलन

1. बालकांचे विविध उपक्रम घेतल्यामुळे त्यांच्यात नवनवीन गोष्टी शिकण्याची उत्सुकता निर्माण झाली. आनंददायी शिक्षण सुरु झाले.
2. बालकांचा उत्साह पाहून पालकांनी आनंद व्यक्त केला. काही कृतींत स्वत:हून पुढाकार घेतला. बालकासाठी आपण स्वत: काहीतरी वेगळे करू शकतो, ही भावना मिळाली.
3. उपक्रमामुळे बालकांची शाळापूर्व तयारी आणि शालेय शिक्षणाची सुरुवात चागली झाली.
4. बालकांच्या निरीक्षण क्षमता विकासास पूरक आणि पोषक वातावरण मिळाले.
5. बालकांच्या पूर्व प्राथमिक ज्ञानात भर पडली.
6. बालकांच्या बौद्धिक क्षमतेबाबत पालकांना जाणीव झाली.
7. श्रवणाची सवय विकसित झाली.
8. हस्त नेत्र समन्वय वाढला.
9. विद्यार्थीस्नेही वातावरण झाल्याने अबोल बालके बिनधास्तपणे बोलू , वावरू लागली.
10. अंक, अक्षर ओळख झाली.

## 5) नवोपक्रमाची यशस्वीता व फलनिष्पत्ती

### शिकू आनंदे ,
### हसत - खेळत अंगणवाडीसंगे !

या नवोपक्रमाच्या माध्यमातून मला स्वत:ला शिकता आले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ( NEP ) ला अनुसरून निपुण भारतची पूर्व प्राथमिक स्तरावरची उद्दिष्टे गाठण्यासाठी पहिल्या सत्रात प्रयोग म्हणून राबवलेल्या सदर उपक्रमाचे यश पाहता अंगणवाडी सेविका म्हणून मला खूप समाधान वाटले. प्रेरणा मिळाली. आत्मविश्वास वाढला. माझा नवोपक्रम यशस्वी झाला याची पुढील बाबींवरून खात्री पटली. त्याची **फलनिष्पत्ती** पुढीलप्रमाणे.

1. निश्चित कृतीकार्यक्रम राबविल्याने पूर्व प्राथमिक शिक्षणाचा पाया बळकट झाला.
2. विविध उपक्रमांत बालकांना संधी दिल्याने प्रत्येकजण व्यक्त झाला.
3. बालकांना शाळेची गोडी लागली. ती नियमित येवू लागली. सकाळच्या शाळेलाही पूर्ण उपस्थिती मिळाली. छोटी छोटी कामे आवडीने शिस्तीत , टापटीपपणे पार पाडू लागली.
4. उपक्रमांत शिकलेल्या गाणी, गोष्टी, कृती यांपेक्षा नवीन कृती स्वत: करून दाखवू लागली.
5. शालेय प्रार्थना, भोजन, अन्य उपक्रम यांत बालके एकमेकांना सांभाळून घेऊ लागली.
6. घर, शाळा, परिसर येथे प्रत्ययास आलेल्या बाबी शाळेत सांगू लागली. कृतींमध्ये एकमेकांचे अनुकरण करू लागली.
7. स्वच्छ, नीटनेटकी शाळेत येऊ लागली, राहू लागली.
8. बालकांशी प्रेमाचे साहचर्य ठेवल्याने आजारी रजेतदेखील मला येण्याचा आग्रह करू लागली. त्यांचा वाढता उत्साह लक्षात घेऊन त्यांच्यातील कलागुणांना खतपाणी मिळाले.

एकूणच सदर उपक्रमामुळे जसा बालक - पालक यांमध्ये आत्मविश्वास वाढला तसा नवा दृष्टिकोन मिळाल्याने माझाही विश्वास दुणावला. 21 वर्षातला माझा हा पहिला अनुभव मला बरेच काही शिकवून गेला. बालक - पालक -शिक्षक नाते अधिक दृढ झाले. बालक - पालक - शिक्षक यांतील विविध कौशल्यांना संधी देणारा हा उपक्रम अन्य अंगणवाडी सेविकांनाही सोपा, सुलभ, उपयुक्त तसेच सोयीस्कर देखील आहे.

## 6) समारोप

**शिकू आनंदे ,**
**हसत - खेळत अंगणवाडीसंगे !**

या उपक्रमातून आपल्या मुलांसाठी आपण जाणीवपूर्वक काही वेगळे केले तर आत्मसमाधान मिळते , याचा प्रत्यय आला. पालकांनाही त्यांच्या मुलांच्या गुणवत्तेबाबत वेळीच अवगत करून देता आले, याचेही समाधान आहे. बालकांच्या सामान्यज्ञानात भर टाकणे, सभोवताली घडणा-या गोष्टींकडे डोळसपणे पाहण्याची दृष्टी देणे , इयत्ता पहिलीतील त्यांचा प्रवेश सुकर आणि आनंददायी करणे यासाठी प्रयत्न केलेल्या या उपक्रमांत मला 100 % आत्मविश्वास मिळाल्याने व्यक्तिश: मी खूप समाधानी आहे.

विहित उपक्रमात शेवटपर्यंत मला सहकार्य करणारी माझी बालके, पालकवर्ग, आदर्श शाळा नाखरे नं. 1 चे शिक्षकवृंद, आशासेविका, आरोग्यसेवक, निर्मल ग्रामपंचायत नाखरे , अधिकारीवर्ग यांना मन:पूर्वक धन्यवाद ! आदर्श शाळा नाखरे नं.चे पदवीधर शिक्षक श्री. सुहास वाडेकर सर यांच्यामुळेच हा उपक्रम साध्य व सिद्ध करू शकले. मनस्वी आभार !

**धन्यवाद !!**

## 7) संदर्भसूची व परिशिष्टे


1. आकार बालशिक्षणक्रम पुस्तिका
2. अंगणवाडी सेविकांसाठीची हस्तपुस्तिका
3. अंगणवाडी शिक्षिका प्रशिक्षण
4. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020
5. माझी बालमार्गदर्शिका - संकलन श्री. सुहास वाडेकर
6. पहिलं पाऊल THE FIRST STEP - संकलन श्री. सुहास वाडेकर
7. अंगणवाडी साहित्य पेटी
8. जादूचा पेटारा - अंगणवाडी नाखरे नं.1


## सहभागी विद्यार्थी यादी

| अ.नं. | बालकाचे नाव | वयोगट |
|---|---|---|
| 1. | स्वरा संतोष साळवी | 5 ते 6 |
| 2 | प्रज्वल महेश साळवी | |
| 3. | सानिका रणजित हरमले | |
| 4. | आदिश्री बिपीन आयरे | |
| 5. | साईश्री स्वप्निल पाडळकर | 4 ते 5 |
| 6. | नेत्रा समिर साळवी | |
| 7. | विघ्नेश विजय साऴवी | |
| 8. | स्वराज्ञी मंगेश महाडीक | 3 ते 4 |
| 9. | काव्या विवेक साळवी | |
| 10. | कार्तिकी विवेक साळवी | |
| 11. | भैरवी संदीप हरमले | |

# छायाचित्रे



कार्डांच्या मदतीने अध्ययन

तालबद्ध हालचाली





कागदापासून होडी

## नवोपक्रम - बालक कृती VIDEO LINKS

https://drive.google.com/file/d/1nWyv1LVPET5cHFX1D_iWAmayusRFEByc/vi
ew?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1nRDzeChQiJjs3InIogp4Hh-
yerSDhyIO/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1n23ZkYB8g6HyjTXH-
IyJqBxwtg3XQkQB/view?usp=drivesdk

## संदर्भ : पहिलं पाऊल the FIRST STEP

https://drive.google.com/file/d/1meL0fo0AkY2tYZDqCUqSgvoB9__tcJAY/view
?usp=drivesdk

## संदर्भ : माझी बाल मार्गदर्शिका

https://drive.google.com/file/d/1sUpKec7DTiZxXz7Qj39bVCW96F48F9At/view
?usp=drivesdk